# मंत्रिमंडळ निर्णय

## दिनांक : १६ ऑक्टोबर २०१८

## ( बैठक क्र. १९६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी एसपीव्ही मॉडेलसह विशेष दर्जा** | गृहनिर्माण |
| २ | प्रधानमंत्री कृषी सिंचन व बळीराजा जलसंजीवनी योजना<br>**सिंचन प्रकल्पांच्या अर्थसहाय्यासह कर्जाची रक्कम महामंडळाच्या खात्यात थेट जमा करण्यास मान्यता** | जलसंपदा |
| ३ | यंदा २५ हजार शेतकऱ्यांना लाभ<br>**मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतून एक लाख शेतकऱ्यांना पंप मिळणार** | ऊर्जा |
| ४ | प्रधानमंत्री आवास योजना<br>**सोलापूरच्या रे नगर प्रकल्पासाठी विशेष बाब म्हणून १२० कोटींचा निधी** | गृहनिर्माण |
| ५ | **साताऱ्यातील कुडाळी प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता** | जलसंपदा |
| ६ | **सिंधुदुर्गातील अरुणा प्रकल्पासाठी १६८९ कोटींना सुधारित प्रशासकीय मान्यता** | जलसंपदा |

## धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी
## एसपीव्ही मॉडेलसह विशेष दर्जा

**धारावी** पुनर्विकास प्रकल्पाला विशेष प्रकल्प दर्जा देण्यासह त्यासाठी विशेष हेतू कंपनी (SPV) मॉडेल राबविण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या मॉडेलमध्ये मुख्य भागीदाराच्या ८० टक्के समभागाबरोबरच शासनाचा २० टक्के समभागासह सक्रीय सहभाग राहणार आहे. या निर्णयामुळे मुंबईच्या विकासाचा केंद्रबिंदू ठरणाऱ्या या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस नव्याने चालना मिळणार आहे.

धारावी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत २००७-२०११ आणि २०१६ मध्ये मागविण्यात आलेल्या दोन निविदा प्रक्रियांना पाच वेळा मुदतवाढ देऊनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. या पार्श्वभूमीवर उंचीवरील मर्यादा, व्यावसायिक व औद्योगिक गाळे, लोकसंख्येची उच्च घनता, मालमत्तांचे मिश्रण या प्रकारच्या विशेष अडचणींवर मात करुन हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी निविदा प्रक्रियेमध्ये गुंतवणूक आकर्षित करण्याची आवश्यकता होती. यामुळे धारावीतील औद्योगिक, व्यावसायिक व झोपडपट्टीवासी आणि सदनिकाधारकांचे योग्य पुनर्वसन होण्यासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्पाला विशेष प्रकल्पाचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विशेष प्रकल्प दर्जा देताना मुद्रांक शुल्क सवलत, राज्य जीएसटी परतफेड, मालमत्ता करामध्ये सवलती, फंजीबल प्रिमियम शिथिल करणे, प्रिमियम माफी इत्यादी सवलतींना मान्यता देण्यात आली आहे. तसेच सेक्टर १ ते ५ यांना एकत्रित करुन धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा एकात्मिक मास्टर प्लान विकसित करुन जागतिक निविदा मागविण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. याबरोबरच, धारावी अधिसूचित क्षेत्राला लागून असलेली, मात्र धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कक्षेबाहेर असलेली रेल्वेची माटुंगा-दादर येथील सुमारे ३६.४२ हेक्टर (९० एकर) तसेच जवळपासची ६.९१ हेक्टर जमीन ही धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत समाविष्ट करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सचिव समितीने मान्य केलेल्या व गृहनिर्माण विभागाने मंजूर केलेल्या इतर मुद्यांनाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

याप्रमाणेच एकूण २०० एकरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी झोपडीधारकांची प्रमाणित यादी, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून जाहीर करणे व झोपडपट्ट्यांच्या निष्कासनाचे सामूहिक आदेश, खासगी जमिनीवरील झोपडपट्टी क्षेत्राखालील जमीन रुपांतरित करणे, निष्कासित केलेल्या झोपडीधारकांची संक्रमण शिबिरात व्यवस्था करणे किंवा अशा झोपडीधारकांना भाड्यापोटी ठराविक रक्कम प्रदान करणे, धारावी पुनर्विकास इमारतींसंदर्भात अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्राचे अधिकार वापरणे आदी अधिकार हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी यांना देण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या सर्व मान्यतांमुळे धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अंमजबजावणीला नव्याने चालना मिळणार आहे.

-----०-----

प्रधानमंत्री कृषी सिंचन व बळीराजा जलसंजीवनी योजना

## सिंचन प्रकल्पांच्या अर्थसहाय्यासह कर्जाची रक्कम महामंडळाच्या खात्यात थेट जमा करण्यास मान्यता

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील प्रकल्पांसाठी मिळणारे केंद्रीय अर्थसहाय्य व राज्य हिश्शापोटी नाबार्डकडून मिळणारे कर्ज तसेच बळीराजा जलसंजीवनी योजनेतील नाबार्डचा कर्जनिधी महामंडळाच्या खात्यात थेट जमा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे प्रशासकीय बाबींसाठी होणारा कालापव्यय दूर होऊन सिंचन प्रकल्पांना गती मिळणार आहे. यासंदर्भात केंद्र शासन व नाबार्ड यांना राज्य शासनाकडून विनंती करण्याबाबतचे पत्र पाठविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत सध्या केंद्र शासनाकडून मिळणारे केंद्रीय आर्थिक सहाय्य तसेच राज्य शासनाच्या हिश्शापोटी नाबार्डकडून मिळणारी कर्जाची रक्कम राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा होते. राज्यातील प्रकल्पांसाठी हे आर्थिक सहाय्य प्राप्त करून घेण्यासाठी जलसंपदा विभागाकडून वित्त विभागास तसा प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यास मंजुरी मिळून निधी उपलब्ध झाल्यानंतर संबंधित प्रकल्पांना निधी वितरित करण्यात येतो. या प्रक्रियेस बराच कालावधी लागतो. त्यामुळे आज हा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील आर्थिक व भौतिक अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीने प्रत्येक आर्थिक वर्षासाठी राज्यपालांकडून निर्देश देण्यात येतात. या निर्देशांमधून प्रधानमंत्री कृषी सिंचन व बळीराजा जलसंजीवनी योजनांतर्गत प्रकल्पांना निधी वितरित करण्यास सूट देण्याची विनंती राज्यपालांना करण्यासही आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या हिश्शापोटी नाबार्डकडून कर्ज प्राप्त करून घेण्यास आणि त्यानुसार नाबार्डसोबत करार (Memorandum of Agreement-MoA) करण्यासही परवानगी देण्यात आली.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत (PMKSY) २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत राज्यातील १७ मोठे व ९ मध्यम अशा एकूण २६ प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी केंद्र शासनाकडून ३८३० कोटींचे अर्थसहाय्य मिळणार आहे. राज्य हिश्शापोटी १२ हजार ७७३ कोटी रुपये उभे करण्यासाठी केंद्र शासनाने नाबार्डच्या माध्यमातून दीर्घकालीन (१५ वर्ष) व सवलतीच्या व्याजदराने (६ टक्के) कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याचप्रमाणे विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी या भागातील जिल्ह्यांसह उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण भागातील एकूण ११२ बांधकामाधीन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी बळीराजा जलसंजीवनी योजना आखण्यात आली आहे. यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून २५:७५ या प्रमाणात अर्थसहाय्य मिळणार आहे. या योजनेंतर्गत एकूण ९१ प्रकल्पांना ३८३१.४२ कोटी रुपयांचे केंद्रीय अर्थसहाय्य प्राप्त होणार असून राज्य हिश्शापोटी नाबार्डकडून ११४९४.२४ कोटी कर्ज प्राप्त होणार आहे. त्यामध्ये विदर्भ व मराठवाड्यातील ८३ लघु पाटबंधारे प्रकल्पांसह ३ मोठे व मध्यम प्रकल्प आणि उत्तर महाराष्ट्रातील ३ व पश्चिम महाराष्ट्रातील २ प्रकल्पांचा समावेश आहे. या प्रकल्पांच्या पूर्णत्वानंतर ३ लाख ७६ हजार ९१५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

-----0-----

## यंदा २५ हजार शेतकऱ्यांना लाभ
## मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेतून
## एक लाख शेतकऱ्यांना पंप मिळणार

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे आणि त्या माध्यमातून सिंचनाखालील क्षेत्र वाढावे यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या योजनेंतर्गत पुढील तीन वर्षात एक लाख पंप बसविण्यात येणार असून त्यातील २५ हजार पंप यंदाच्या आर्थिक वर्षात देण्यात येणार आहेत. कृषीपंप वितरणात पेड पेंडिंगमधील शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यांनी भरलेली अनामत रक्कम शेतकऱ्याच्या हिश्शात समायोजित करण्यात येईल.

राज्यात कृषीपंप जोडणीची मागणी वाढती असून त्यामुळे महावितरण कंपनीवर ताण येत आहे. त्यासोबतच कृषीपंपांना सवलतीच्या दरात वीजजोडणी देण्यात येत असल्यामुळे राज्य शासनाकडून २०१७-२०१८ मध्ये ४८७० कोटी रूपयांचे अनुदान तर क्रॉस सबसिडीद्वारे ८०९६ कोटी रूपये महावितरणला द्यावे लागतात. याबरोबरच कृषीपंपांना वीजजोडणीसाठी ६३ केव्हीए किंवा १०० केव्हीए क्षमतेचे रोहित्र उभारण्यात येते. रोहित्रावरील लघुदाब वाहिन्यांची लांबी वाढल्याने वीजपुरवठा कमी दाबाने किंवा वारंवार खंडित होतो. रोहित्रात बिघाड, वीज अपघात, वीज चोरी अशा विविध कारणांनी अखंडित वीजपुरवठा देणे शक्य होत नाही. त्यासोबतच आर्थिक आणि प्रदूषणाच्या दृष्टीने विचार केल्यास डिजेलवरील पंप हा पर्याय होऊ शकत नसल्याने सौर कृषी पंप बसविण्याचा प्रस्ताव पुढे आला. त्यानुसार मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्या माध्यमातून एक लाख कृषीपंप बसविण्यात येणार आहेत. यासाठी सर्वसाधारण लाभार्थ्यांना पंपाच्या रक्कमेच्या १० टक्के तर अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांना केवळ ५ टक्के हिस्सा द्यावा लागणार आहे. या योजनेत पाच एकर क्षेत्र असलेल्यांना तीन अश्वशक्तीचे डीसी आणि पाच एकरपेक्षा जास्त क्षेत्र धारण करणाऱ्यांना पाच अश्वशक्तीचे एसी किंवा डीसी पंप बसविता येणार आहेत. या योजनेमध्ये शाश्वत जलस्त्रोत उपलब्ध असणारे, विद्युतीकरणासाठी वन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नसणारे, महावितरणकडे विद्युत जोडणीसाठी पैसे भरुनही प्रलंबित असणाऱ्या शेतकऱ्यांपैकी अतिदुर्गम भागातील शेतकरी तसेच धडक सिंचन योजनेतील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

या योजनेत २०१८-१९ मध्ये पहिल्या टप्प्यात २५ हजार, २०१९-२० मध्ये ५० हजार तर २०२०-२१ मध्ये २५ हजार अशा तीन टप्प्यात पंप बसविण्याची कार्यवाही करण्यात येणार असून योजनेसाठी पहिल्या टप्प्यात ८५८.७५ कोटी, दुसऱ्या टप्प्यात १७१७.५० कोटी आणि तिसऱ्या टप्प्यात ८५८.७५ कोटी खर्च येणार आहे. योजनेचा प्रत्येक टप्पा सुरू झाल्यापासून १८ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. योजनेची संपूर्ण अंमलबजावणी महावितरणकडून होणार असून विविध विभागांचे समन्वय करण्याची जबाबदारीही महावितरणचीच राहणार आहे. जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या निवडीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तर राज्यस्तरावरील योजनेच्या संनियंत्रणासाठी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे.

----o----

प्रधानमंत्री आवास योजना

## सोलापूरच्या रे नगर प्रकल्पासाठी विशेष बाब म्हणून १२० कोटींचा निधी

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सोलापूर येथे ३० हजार परवडणाऱ्या घरांच्या बांधकामाचा रे नगर गृहप्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी राज्याच्या हिश्शापोटी महाराष्ट्र निवारा निधीतून विशेष बाब म्हणून १२० कोटी निधी वितरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल लाभार्थ्यांसाठी घरकुले बांधण्याच्या कार्यवाहीस गती येणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये खासगी भागीदारीतूनही परवडणाऱ्या घरांची निर्मिती करता येते. खासगी भागीदारीद्वारे हा प्रकल्प राबवताना केंद्राकडून प्रति लाभार्थी १ लाख ५० हजार रुपये तर राज्याकडून १ लाख रुपये अनुदान दिले जाते. केंद्राच्या अनुदानाचा वाटा बांधकामाच्या प्रगतीआधारे ४० टक्के, ४० टक्के आणि २० टक्के अशा तीन टप्प्यांमध्ये देण्यात येतो.

सोलापूर येथे रे नगर फेडरेशनच्या भागीदारीने ३० हजार परवडणाऱ्या घरांचे बांधकाम करण्याचा प्रकल्प सुरु आहे. या गृहप्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने दिलेल्या मान्यतेनुसार फेडरेशनने प्रकल्पाचे काम सुरु केले आहे. मात्र, प्रकल्प पूर्ण करताना संबंधित संस्थेस काही आर्थिक अडचणी येत आहेत. पात्र लाभार्थ्यांना वेळेत घरे मिळण्यासाठी या प्रकल्पास अनुदान देऊन प्रकल्प वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या हिश्शातील ४० टक्क्यांचा पहिल्या टप्पा म्हणून प्रति लाभार्थी ४० हजार रुपयांप्रमाणे एकूण १२० कोटींचा हा निधी महाराष्ट्र निवारा निधीतून मंजूर करुन वितरित करण्यात येणार आहे. याप्रकारचे अनुदान देताना असलेली जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण असणे आणि बँक गॅरंटीची अट शिथिल करुन एक विशेष बाब म्हणून हा निधी मंजूर करण्यात आला आहे.

----०----

**जलसंपदा** विभाग

## साताऱ्यातील कुडाळी प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता

सातारा जिल्ह्याच्या जावळी तालुक्यातील कुडाळी मध्यम प्रकल्पास २०१३-१४ च्या दरसूचीनुसार ६३५ कोटी किंमतीस दुसरी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे जावळी तालुक्यातील ४२ गावांतील ५ हजार ३२७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

कुडाळी मध्यम प्रकल्पांतर्गत कुडाळी नदीवर जावळी तालुक्यातील महू आणि हातगेघर येथे धरणे बांधण्यात येत आहेत. या दोन्ही धरणांवर प्रत्येकी दोन अशा एकूण ४ उपसा सिंचन योजना सुरु करण्यात येणार आहेत. त्याद्वारे ४६१ हेक्टर क्षेत्रास आणि कालव्याद्वारे ४६८८ हेक्टर क्षेत्रास अशा एकूण ५ हजार ३२७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

-----०-----

## सिंधुदुर्गातील अरुणा प्रकल्पासाठी १६८९ कोटींना सुधारित प्रशासकीय मान्यता

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडी तालुक्यातील अरुणा मध्यम प्रकल्पास २०१६-१७ च्या दरसूचीनुसार १ हजार ६८९ कोटी किंमतीस तिसरी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण ५ हजार ३१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत वैभववाडी तालुक्यातील हेत येथे अरुणा नदीवर ९३.३७८ दशलक्ष घनमीटर क्षमतेचे धरण बांधण्यात येत आहे. या धरणामुळे वैभववाडी तालुक्याच्या १५ गावातील ४ हजार ४७५ हेक्टर व रत्नागिरी जिल्ह्यातील राजापुर तालुक्याच्या दोन गावांतील ८३५ हेक्टर क्षेत्र अशा एकूण ५ हजार ३१० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करण्यात आला आहे.

-----०-----